# जितेंद्र ठक्कर केंद्रीय मंडळावर

**म. टा. प्रतिनिधी,** नाशिक

येथील ठक्कर्स डेव्हलपर्स लि.चे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांना भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाअंतर्गत कार्य करणाऱ्या राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती २०१५ ते २०१७ या आर्थिक वर्षांसाठी असेल.

खास बांधकाम क्षेत्रासाठी स्थापन केलेल्या कन्ट्रक्शन स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेत कार्य करण्यासाठी या क्षेत्रातून देशभरातील १५ संचालक निवडण्यात आले आहेत. जितेंद्र ठक्कर यांना एक सन्मानीय संचालक म्हणूनही वेगळी नियुक्ती देण्यात आली आहे.



महामंडळ देशातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये कौशल्यप्राप्त मनुष्यबळाची असलेली वाढती गरज भागविणे आणि येथील विविध कौशल्यांची मागणी आणि पुरवठा यातील सध्याची दरी कमी करणे या उद्देशाने कार्य करीत आहे. संपूर्ण देशात कौशल्य विकासाचे सुनियोजित व्यवस्थापन करण्यासाठी सर्व संबंधित घटकांच्या पाठिंब्याने एक विश्वासार्ह व परिणामकारक यंत्रणा उभी करणे आणि बांधकाम उद्योगातील कौशल्यविषयक सध्याच्या व भविष्य काळातील गरजा भागविणे या उद्देशाने कन्ट्रक्शन स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल ऑफ इंडिया ही संस्था कार्य करीत आहे. या दोन्ही नेमणुका नवी दिल्ली येथील क्रेडाईच्या अखिल भारतीय संघटनेच्या हॉलमध्ये संपन्न झालेल्या पदग्रहण सोहळ्याप्रसंगी जाहीर करण्यात आल्या. ठक्कर यांच्या नियुक्ती बद्दल शहरातील नामवंत विकासकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.